# जाहिरात

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,

## पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांचे कार्यक्षेत्रामधील झोपडपट्टीपुनर्वसन योजना राबवण्यासाठी प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसकामार्फत प्रस्ताव दाखल होतात. विकसक नोंदणी तसेच त्यामधील बदलासंदर्भात कंपनी अधिनियम व भागीदारी अधिनियमांतर्गत कायदे विषयक बाबींबाबत कायदेशीर सल्ला देणेसंदर्भात तसेच रजिस्ट्रार ऑफ कंपनी आणि सहाय्यक निबंधक, भागीदारी संस्था यांचेकडून आवश्यक त्या घटकासाठी नोंदणी प्रमाणपत्र घेणे याकरिता कंपनी सचिवांच्या सेवेची गरज असते. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पॅनेलवर कंपनी सेक्रेटरी/ PCS फर्म (Practicing Company Secretaries Firm) यांची करार पध्दतीने ३ वर्षाच्या कालावधीकरीता कंत्राटी सेवा उपलब्ध करावयाची आहे. त्याकरीता प्राधिकरणाच्या पॅनेलवर कार्यरत होण्यास इच्छुक व पात्र कंपनी सेक्रेटरी/ PCS फर्म यांचेकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या www.srapune.in या संकेतस्थळावर दि.२१/५/२५ ते दि.३१/५/२०२५ या कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

A. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे अंतर्गत कंपनी सेक्रेटरी सेवा उपलब्ध करून देणाऱ्या पॅनेलवर काम करण्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-

१. अर्जदारहा भारताचा नागरिक असावा/ PCS फर्म ही कंपनी कायद्यांतर्गत नोंदविलेली कंपनी/एल एल पी असावी.

२. उमेदवाराने/संस्थेने भारतीय कंपनी सचिव संस्था (ICSI)यांचेकडील कंपनी व्यावसायीक सचिव नोंदणीचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

३. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदारासकिमान १५वर्ष व्यावसायीक कंपनी सेक्रेटरी म्हणून काम केल्याचा अनुभव असावा.

४. अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. अर्जदारास/PCS फर्मला प्रामुख्याने भारतीय कंपनी अधिनियम, १९५६, भारतीय भागीदारी अधिनियम १९३२, लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप ॲक्ट २००८ चे तसेच इतर संबंधित कायद्यांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. PCS फर्मचे नोंदणीकृत कार्यालय पुणे महानगरपालिका किंवा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये असले पाहिजे.

७. अर्जदारास/PCS फर्मकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित अधिनियम/नियम/ शासन निर्णय/परिपत्रके यांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. PCS फर्मचे गेल्या ३ आर्थिक वर्षांतील सरासरी वार्षिक व्यावसायिक ढोबळ उत्पन्न (GST वगळून) रु. २५ लाखांपेक्षा कमी नसावे.

९. PCS फर्मकडे व्यावसायिक कर, पॅन, TAN, जीएसटी क्रमांक, उद्योग/उद्योग आधार, (दुकान आणि आस्थापना कायदा) व इतर नोंदणी असणे आवश्यक आहे.

B. <u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-</u>

१) विहित नमुन्यातील अर्ज,

२) शैक्षणिक अर्हते संदर्भात सर्व गुणपत्रके व प्रमाणपत्रे, कंपनी सेक्रेटरीचे व्यावसायाचे प्रमाणपत्र (सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात) व भारतीय कंपनी सचिव संस्थान (ICSI) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

३) अर्जदाराने त्यांचे अनुभवाबाबतचे स्व-साक्षांकनांचे घोषणापत्र सादर करावे. PCS फर्मला/ PCS फर्मच्या सर्व भागीदारांकडे ICSI द्वारे जारी केलेले व्यावसायाचे वैध प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

C. <u>निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया :-</u>

१) प्राप्त अर्जांची छानन्नी करून मुलाखतीसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेच्या www.srapune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२) प्राप्त अर्जांची छाननी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व झोपुप्रा अधिनियमातील कामकाज व इतर तद्अनुषंगिक बाबींच्या आधारे करण्यात येईल. त्यास अनुसरुन त्यांचे गुणांकन केले जाईल व विशिष्ट गुणांकनाच्या वरील उमेदवारांनाच मुलाखतीसाठी निमंत्रित केले जाईल.

३) गुणांकन तपशील :-

- ६०% च्या वरील गुणांकन असणाऱ्या अर्जदारास मुलाखतीस बोलवण्यात येईल.
- सर्वात जास्त गुणांकन असणाऱ्या अर्जदाराची निवड त्याच्या गुणवत्तेनुसार होईल.

४) अर्जदारांची निवड ही मुलाखतीमधील गुणांच्या आधारे करण्यात येईल.

५) मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

६) कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म पॅनेल निवडीसाठी गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडीबाबतचे संपूर्ण अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या निवड समितीस राहतील.

७) कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/तहकूब करणे/रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे राखीव राहतील.

D. कंपनी सेक्रेटरी/PCS फर्मफी चे दर व त्याबाबतचे निकष :-

| अ. क्र | तपशील | पदसंख्या | फी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | प्राधिकरणाच्या कामकाजासंदर्भात लेखी अभिप्राय देणे. | १ | रू.२५०००/- प्रति प्रकरण | गुंतागुतींच्या कायदेशीर संबंधित प्रकरणी अभिप्राय घेण्यात येतील व त्या संदर्भातील शुल्क विकसकामार्फत अदा करण्यात येईल. |

E. कंपनी सेक्रेटरीपॅनेल वर नियुक्त उमेदवारांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कंपनी सेक्रेटरी सेवासंदर्भात फी अदा करणेच्या संदर्भातील अनुषंगिक बाबी खालील प्रमाणे राहतील :-

अ.) पॅनेलवरील कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसक यांच्या कंपनी/ भागीदारी संस्था/ लिमिटेड लायाबिलीटी पार्टनरशिप/ जॉईंट व्हेंचर्सबाबत आवश्यक तेथे कायदेशीर सल्ला देणे आवश्यक राहील, तसेच कोणत्याही भागीदारांमध्ये अथवा संचालक अथवा सदस्यांमध्ये बदल झाल्यास, अथवा त्यांचे भागीदारीमध्ये बदल झाल्यास किंवा कोणत्याही स्वरुपाचे वाद निर्माण/उपस्थित झाल्यास त्यासंदर्भात भारतीय कंपनी अधिनियम, १९५६, भारतीय भागीदारी अधिनियम १९३२, लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप ॲक्ट २००८ च्या तरतुदीन्वये कायदेविषयक अभिप्राय देणे व आवश्यक तेथे कायदेशीर मार्गदर्शन या प्राधिकरणास करणे.

आ.) प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसकास त्यांच्या भागीदारी संस्थेकरीता आवश्यक असणारे भागीदारी संस्थेचे प्रमाणपत्र मिळणेकामी आवश्यक तो कायदेशीर पाठपुरावा निबंधक, भागीदारी संस्था, पुणेयांचेकडे करून सदरचे प्रमाणपत्र विहीत मुदतीत मिळवणेबाबत कार्यवाही करणे. सदरचे कामकाज या प्राधिकरणाकडील नोंदणीकृत झालेले किंवा नोंदणी करू इच्छिणारे विकसक हे पॅनेलवरील कंपनी सेक्रेटरी यांना परस्पर सादर करतील. विकसकाच्या मागणीप्रमाणे भागीदारी दस्ताचा करारनामा/ कंपनी स्थापित संदर्भातील मसुदे/ जॉईंट व्हेंचर्स करारनामे व इतर संबंधित करारनाम्याचे मसुदे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील तरतूदी व योजनेचे उद्दिष्ट लक्षात घेऊन तयार करावेत व सदरचे काम त्यांनी आपले स्तरावर विकसकाशी समन्वय साधून करावयाचे आहे. यासंदर्भातील शुल्क पॅनेलवरील नियुक्त होणारे कंपनी सेक्रेटरी आणि विकसक यांनी आपआपसांत ठरवून निश्चित करावयाचे आहे व त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण जबाबदार असणार नाही.

इ.) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पॅनेलवरील नियुक्त करण्यात येणा-या कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म यांचेकडून उपरोक्त संदर्भात कोणतेही अभिप्राय घेणे आवश्यक वाटल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अशा कंपनी सेक्रेटरीला स्वतंत्ररित्या पत्राद्वारे अभिप्राय देणेबाबत कळविण्यात येईल व अशा कायदेशीर अभिप्रायाचे उपरोक्त परिच्छेद D मध्ये नमूद शुल्क संबंधित विकसकाकडून उपरोक्त नमूद केलेप्रमाणे अदा करण्यात येईल.

ई.) पॅनेलवर नियुक्त करण्यात येणा-या कंपनी सेक्रेटरीच्या/ PCS फर्मच्या कार्यक्षमता व सचोटीबाबत कोणताही संशय निर्माण झाल्यास अथवा कोणतेही अनियमित कामकाज केल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची पॅनेलवरील नियुक्ती खंडीत/ रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

ए.) कंपनी सेक्रेटरी संदर्भातील शीर्षस्थ संस्था निर्धारित करेल एवढ्याच दरमर्यादेत शुल्क आकारणी अनिवार्य असेल.

ऐ.) विकसकांचे गठन, त्यामधील बदल, विवाद, संमतीपत्रे प्राप्त करतेवेळी स्थिती व बदल या सर्व बाबींचा योजनांच्या कार्यान्वयनावर परिणाम होऊ नये यासाठी प्राधिकरणाला कायदेशीर सल्ला देण्याचे कामकाज पॅनेलवरील कंपनी सेक्रेटरी यांनी करणे आवश्यक राहिल.

ओ.) या प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची कोणत्याही स्वरूपातील कोणतेही शुल्क देण्याची जबाबदारी असणार नाही व प्राधिकरणावर कोणतेही दायित्व असणार नाही.

अर्जदारांना सर्वसाधारण सूचना :-

१. पॅनेलकंपनी सेक्रेटरी/ PCS फर्म करिता करावयाच्या अर्जाचा नमुना पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या www.srapune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नाव पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, पिनकोड नंबर, भ्रमणध्वनी/ दूरध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. विषयक माहिती आवश्यक त्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

नीलेश ए. गटणे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे-१६

D:\EST 2018\S R A all new\jahirat\CWD -Company Secretory Advertisement.docx

| झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे पॅनलवर नियुक्त करण्यात येणाऱ्या कंपनी सेक्रेटरी/PCS फर्मकरिता अर्जाचा नमुना. | | |
|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | |
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| २. | कायम स्वरूपी पत्ता व संपर्क क्र. | |
| ३. | ईमेल आयडी/भ्रमणध्वनी क्र. | |
| ४. | फर्म स्थापन दिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | अनुभव | |
| ७. | भारतीय कंपनी सचिव संस्था (ICSI) यांचेकडील कंपनी सेक्रेटरीचे नोंदणीचे आणि व्यवसायाचे प्रमाणपत्र. | |
| ८. | इतर शासकीय कार्यालयातील पॅनेलवर नियुक्त असल्यास त्याचा तपशील. | |

सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेल्या दि. ---- रोजीच्या जाहिरातीमधील नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असून जाहिरातीमधील सर्व शर्ती - अटींनुसार काम करण्यास मी/ आमची फर्म तयार आहे. कृपया झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पॅनेलवर आमची नियुक्ती व्हावी.

स्थळ : --------------

दिनांक : -----------

-------------------------

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

संलग्न कागदपत्रांची यादी :-

१) -------------------

२) -------------------

३) -------------------

४) -------------------

५) -------------------